राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय भगवान अहिर,
मु.पो.ता. वाळवा, जि. सांगली. अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इस्लामपूर,
ता. वाळवा, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी ,
मंडल अधिकारी कार्यालय, वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १० / सांगली /पुनर्विलोकन/ २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/९/२००७ |
| ३ | द्वितीय अपिलाचा निर्णय दिल्याची तारीख | २३.१.२००८ |

## पुनर्विलोकन

## विवेचन

प्रस्तुत अपिलामध्ये दिनांक २३.१.२००८ रोजी आयोगाने दिलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची विनंती करणारे अर्ज १.श्री.व्ही.पी.पाटील, अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वाळवा (इस्लामपूर) २.श्री.जी.टी.बिराजदार, निवासी नायब तहसीलदार, वाळवा (इस्लामपूर) ३.श्री.अमर मारुती साळुंखे, सहा.माहिती अधिकारी तथा तलाठी, वाळवा श्री.पी.जी.उरकुडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, वाळवा यांनी केले आहेत.

सर्व अर्जाचे पुनर्विलोकन करुन आयोगाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे :

आपल्याकडे अपील दाखल झाल्याचे आपल्या निदर्शनास आणले न गेल्यामुळे आपल्याला माहीत नव्हते असे म्हणणे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वाळवा यांनी मांडले आहे. अपील दाखल झाले असल्याची माहिती नसल्याची सबब मान्य करता येणार नाही. कनिष्ठ कर्मचाऱ्याने ते निदर्शनास आणले नसल्यास त्याला जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक होते. अशी कारवाई तहसीलदार श्री.व्ही.पी.पाटील यांनी केलेली दिसत नाही.

अपीलकर्त्याने दि.२.५.२००६ रोजी प्रथम अपिलाची दखल घेण्याबाबत तहसीलदार श्री.व्ही.पी. पाटील यांना स्मरणपत्र दिले होते. निवासी नायब तहसीलदार श्री.जी.टी.बिराजदार यांनी या पत्राला उत्तरही दिले आहे. अशा स्थितीत, 'आयोगापुढील सुनावणीची सूचना दि.२७.८.२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्वरित सुनावणी घेऊन माहिती देण्याचा आदेश आपण दिला,' हे श्री.पाटील यांचे म्हणणे रास्त ठरत नाही. स्मरणपत्राची दखल त्यांनी त्याच वेळी घेतलेली नाही, हे स्पष्ट होते.

आपण सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख नाही, असा दावा श्री.पाटील यांनी केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ साठी प्रशासकीय पातळीवर विविध आस्थापनांची कार्यालये इत्यादीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अशी स्वतंत्र व्यवस्था त्या त्या स्तरावर केली आहे. अशी स्वतंत्र व्यवस्था असलेल्या विभागासाठी संबंधित प्रमुखच त्या त्या संदर्भातील सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख ठरतात. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात तहसीलदार हेच सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख ठरतात.

'अपिलीय प्राधिकाऱ्यांना शास्ती लावण्याची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये तरतूद नाही. अधिनियमातील तरतुदीनुसार लागू असलेल्या सेवा नियमान्वये शिस्तभंगाची शिफारस होणे जरुरीचे आहे,' असे प्रतिपादन करुन श्री.पाटील यांनी आपल्याला शास्ती लावण्याचा निर्णय रद्द करण्याची विनंती केली आहे. आदेशाचे योग्य आकलन श्री.पाटील यांनी करुन घेतलेले नाही.

(अ)अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांना शास्ती लावण्यात आलेली नाही.

(ब)'तत्कालीन गावकामगार तलाठी श्री.अमर साळुंखे, तत्कालीन मंडल अधिकारी श्री.पी.जी.उरकुडे, निवासी नायब तहसीलदार श्री.बिराजदार यांनी माहिती हेतुत: डावलल्यामुळे व कायद्याचे पालन न केल्यामुळे रु.२५०००/- शास्ती सर्वांना मिळून लावण्यात येत आहे. माहे फेब्रुवारी देय मार्च महिना या पगारातून सदर शास्ती वसूल करुन दि.१५.३.२००८ पर्यंत पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांची ही जबाबदारी राहील,' असे आदेशात स्पष्ट म्हटले आहे. या शास्तीच्या वसुलीची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांची असल्याचे आयोगाने स्पष्ट नमूद केले आहे.

(क) तहसीलदार, वाळवा श्री.व्ही.पी.पाटील यांनी अपिलाबाबत गांभीर्याने हाताळणी केलेली नाही व अपिलाच्या सुनावणीबाबत केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचे पालन केलेले नाही. त्याबद्दल त्यांना कडक समज देण्यात येत आहे.

असा आयोगाचा आदेश आहे.

लागू असलेल्या सेवा नियमान्वये शिस्तभंगाच्या कारवाईबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत शिफारस करण्याबाबत श्री.पाटील यांनी स्वत:च नमूद केले आहे. पुनर्विलोकन अर्जातील त्यांची ही विनंती मान्य करुन तशी शिफारस करणे शक्य आहे. मात्र आयोगाने याबाबत सौम्य दृष्टिकोन स्वीकारुन तशी शिफारस केलेली नाही.

निवासी नायब तहसीलदार श्री.जी.टी.बिराजदार यांनी आपल्याला बाजू मांडण्याची संधी मिळालेली नसल्याचे नमूद करुन सविस्तर निवेदन केले आहे. संबंधित अपिलाबाबत जन माहिती अधिकारी म्हणून आपली कोणतीही भूमिका नव्हती, तसेच दि.२.५.२००६ रोजी अपीलकर्ता श्री.अहिर यांनी तहसीलदारांना दिलेल्या स्मरणपत्रावर आपण उत्तर पाठविले, असे नमूद करुन श्री.बिराजदार यांनी पुढील निवेदन केले आहे:

"श्री.संजय भगवान अहिर यांची दि.२.५.२००६ रोजीचा तिकिट नसलेला अर्ज तहसील कार्यालयाकडे प्राप्त दि.५.५.२००६ असून सदर स्मरणपत्र अर्ज कोऱ्या कागदावर असून माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कोणताही तरतुदी नसलेला विहित नमुना व स्टॅम्प नसलेला

अर्ज सादर केलेला होता. सदर अर्ज करण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये नसल्याने त्यावर मी माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वाळवा (इस्लामपूर) सदर माहिती गाव दप्तराशी निगडित असल्याने सदरची माहिती त्यांचेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत दि.१४.६.२००६ रोजी कळविले.(परिशिष्ट नं.६) सदर उत्तरावर अर्जदार यांनी आपणाकडे द्वितीय अपील केलेले नाही."

अपीलकर्त्याने स्मरणपत्र पाठविले आहे. असे पत्र पाठवू नये, असे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये कोठेही म्हटलेले नाही. उलट आपल्या अपिलाची दखल प्राथमिक पातळीवरच घेतली जावी यासाठी अपीलकर्त्याने दिलले हे पत्र आहे. त्यावर मुद्रांक असण्याची गरज नाही. अपिलाच्या सुनावणीबाबतचे हे स्मरणपत्र श्री.बिराजदार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांच्या निदर्शनास आणावयास हवे होते, ते त्यांनी केले की नाही हे त्यांच्या निवेदनात स्पष्ट नाही, 'मात्र माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार' अशा पदनामाने उत्तर देऊन त्यांनी अपीलकर्त्याचा अर्ज निकाली काढला आहे. माहिती नाकारण्याबाबत अपीलकर्त्याने द्वितीय अपिलात आपला उल्लेख केला नसल्याचे त्यांचे म्हणणे रास्त नाही. अपीलकर्त्याने माहिती नाकारण्याबाबत त्यांचाही स्पष्ट उल्लेख केला आहे. मूळ अर्ज अथवा अपील यांच्या कार्यवाहीत आपला थेट संबंध आलेला नाही. त्यामुळे आपल्याला दोषी धरण्यात येऊ नये, अशी विनंती त्यांनी केली आहे. त्यांनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदन यांचा विचार करता त्यांचे हे म्हणणे रास्त असल्यामुळे त्यांची विनंती मान्य करुन शास्तीतून त्यांना वगळण्यात येत आहे. मात्र माहितीच्या अधिकारांतर्गत येणारे अर्ज , स्मरणपत्रे आदींची काटेकोरपणे दखल घेण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

'सर्व कागदपत्रे अर्जदार यांना उत्तर देण्याचे असल्याने सत्वर देण्यात यावीत, असे आपण तलाठ्याला कळविले व उत्तर देण्याची प्रक्रिया पूर्ण केली,' हे जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी श्री.पी.जी.उरकुडे यांचे प्रतिपादन अमान्य करण्यात येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मूळ अर्ज संबंधित विभागाकडे जन माहिती अधिकाऱ्यांनी पाच दिवसात पाठविणे आवश्यक होते, ते त्यांनी केलेले नाही. गावकामगार तलाठी यांना पत्र देण्यापलीकडे व

अर्ज निकाली काढल्याचे अपीलकर्त्याला कळविण्यापलीकडे माहिती देण्यासाठी कोणतीही कार्यवाही त्यांनी केलेली नाही. तत्कालीन गावकामगार तलाठी श्री.अमर साळुंखे यांचे निवेदनही याच स्वरुपाचे आहे. या दोघांवरील शास्तीचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

## आदेश

(१) तत्कालीन गावकामगार तलाठी श्री.अमर साळुंखे, तत्कालीन मंडल अधिकारी श्री.पी.जी.उरकुडे यांना लावलेली शास्ती कायम करण्यात येत आहे.

(२) श्री.जी.टी.बिराजदार, निवासी नायब तहसीलदार, वाळवा यांना लावलेली शास्ती रद्द करण्यात येत आहे.

(३) तहसीलदार श्री.व्ही.पी.पाटील यांना समज देण्याचा मूळ निर्णय कायम करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. २८/२/२००८**

# राज्य माहिती आयोग, पुणे विभाग, पुणे

क्र.रामाआ/अपील/पुणे १००/२००७
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
फोन क्र. २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दिनांक : १२/२/२००८.

प्रति,

अपिलीय प्राधिकारी तथा
उपआयुक्त महानगरपालिका,
अमरावती.

जन माहिती अधिकारी,
महानगरपालिका , अमरावती.

विषय : केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम १८ अंतर्गत तक्रार

महोदय,

श्री. विश्वेश्वर भीमराव घोटकर यांनी माहिती अधिकारांतर्गत अर्ज केला होता. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम कलम १८ अंतर्गत तक्रार केलेली होती.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपील/तक्रारीबाबत सर्व संबंधितांकडून माहिती मागविण्यात आली असतां. श्रीम. शकुंतला वि. घोटकर यांनी दि. १४/१२/२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, श्री. विश्वेश्वर भी. घोटकर हे २००६ मध्ये मयत झाले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणात माझे काहीच म्हणणे नाही.

सबब (कै.) विश्वेश्वर भी. घोटकर यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग पुणे विभाग, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,
(स्वाक्षरी) १२।२
(रा.म.गेंगजे)
कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग
पुणे विभाग, पुणे

सोबत : आपले संदर्भाधीन पत्राची छायाप्रत

निर्गमित केल्याचा दिनांक ७५५०८
व स्वाक्षरी

प्रत
श्रीम. शकुंतला वि. घोटकर सी ३/२०४, रोझ परेड अपार्टमेंट, साळुंखे विहार, पुणे ४८

राज्य माहिती आयोग पुणे विभाग पुणे

क्र रामाआ २००८/ अपील/ पुणे १५१३/०१
राज्य माहिती आयुक्त कार्यालय,पुणे विभाग,
पुणे नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिलहॉल समोर, पुणे १
फोन नं. २६०५०६३२/३३, २६०५०५८०.
दिनांक-१२/२/२००८

प्रति,

श्री पंडीत रामचंद्र आरणे
व्दारा जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १
सहकारी संस्था अहमदनगर
प्रा. कवडे बिल्डिंग.झोपडी कॅन्टीगचे मागे
अहमदनगर

विषय:- माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत अपील

संदर्भ:- आपला दि.११/१/२००८ चा अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधित माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम १९(१)खालील प्रथम अपील या कार्यालयास दि. ३/१२/२००७ रोजी प्राप्त झालेले आहे.वास्तविक हे अपिल अपिलीय प्राधिका-याकडे करणे अपेक्षित होते.

उपरोक्त संदर्भाधिन अर्जात आपण असे नमूद केले आहे की जन माहीती अधिका-याकडून मिळालेल्या माहितीने आपले समाधान झाले असल्याने,आपले अपील मी स्वखुशीने मागे घेत आहे. सबब आपले अपील निकाली काढण्यात येत आहे यांची कृपया नोंद घ्यावी.

आपला
(सही) १२.२
(रा. म. गेंगजे)
कक्ष अधिकारी
राज्य माहीती आयोग
पुणे विभाग पुणे

निर्गमित केल्याचा दिनांक
व स्वाक्षरी

श्री. जगताप
अपील निकाली
निघाल्याबाबतची कृपया
नोंद नोंदवहीत घ्यावी

प्रत.
जन माहिती अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक सहकार संस्था महाराष्ट्र शासन पुणे-१

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सयाजी रंगू जगदाळे
फ्लॅट नं.५८, विक्रांतनगर, एमआयडीसी,
शिवराज पेट्रोल पंपामागे, ता.जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सातारा, ता. जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, विक्रांत सहकारी गृह निर्माण संस्था
मर्यादित, विक्रांत नगर, एम.आय.डी.सी. सातारा ४१५ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सयाजी रंगू जगदाळे, फ्लॅट नं.५८, विक्रांतनगर, एमआयडीसी, शिवराज पेट्रोल पंपामागे, ता.जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा ता. जि. सातारा श्री. के. पी. जेबले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

विक्रांत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, विक्रांतनगर, एम.आय.डी.सी., सातारा यांच्या
(१)माहे जून २००५ मध्ये झालेल्या संचालक मंडळाच्या सभेचा संपूर्ण कार्यवृत्तांत.
(२)दि.१७.७.२००५ मधील संचालक मंडळाच्या सभेचा संपूर्ण कार्यवृत्तांत.
(३)माहे ऑगस्ट २००५ मधील संचालक मंडळाच्या सभेचा संपूर्ण कार्यवृत्तांत.
(४)दि.१३.११.२००५ झालेल्या वार्षिक व मासिक सभेच्या कार्यवृत्तांताच्या संपूर्ण नकला तसेच सभेस मुदतवाढ घेणेकामी केलेल्या ठरावाची नक्कल व सभेस मुदतवाढ दिलेल्या आदेशाची नक्कल.

## विवेचन

विक्रांत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, विक्रांतनगर, एम.आय.डी.सी., सातारा या संस्थेच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.सयाजी रंगू जगदाळे यांनी मागितली होती. परंतु संस्थेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षातील भरीव स्वरुपात शासनाकडून अर्थसहाय्य मिळालेले नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, अशी भूमिका संस्थेच्या अध्यक्षांनी घेतली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ती मान्य करुन श्री.जगदाळे यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा, ता.सातारा यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती (मुद्दा क्र.५ व ७) त्यांनी श्री.जगदाळे यांना दिली, मात्र सहकारी गृहनिर्माण संस्थांवर सहकार कायद्याचे नियंत्रण असल्यामुळे संपूर्ण माहिती या संस्थेकडून आपल्याला मिळणे आवश्यक होते व सहाय्यक निबंधकांनी तसा निर्देश देणे आवश्यक होते, असे श्री.जगदाळे यांनी अपिलात नमूद केले आहे. दरम्यानच्या काळात संस्थेच्या कामकाजाबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने या संस्थेवर प्रशासक म्हणून सहकार कायद्याच्या अधिकाऱ्याची नेमणूक सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाने केली. त्यानंतर त्यानंतर ऊर्वरित (मुद्दा क्र.१ ते ४) मुद्यांची माहिती

श्री.जगदाळे यांना देण्याच्या सूचना प्रशासकांना देण्यात आल्या, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री.के.बी.जेबले यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

'नियमांचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे लावणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बुध्दीची किव करावी लागेल,' 'निष्कर्ष सहाय्यक निबंधकांच्या बौध्दिक दिवाळखोरीचे द्योतक आहे,' अशा स्वरुपाची भाषा अपीलकर्त्याने वापरली आहे. ती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी संस्थेवरील प्रशासकाकडून अपीलकर्त्यास ऊर्वरित माहिती दिली गेल्याचा पूर्तता अहवाल दि.२०.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे.
दि.७/२/२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विनायक श्रीकांत कोटणीस
६१/६२, शुक्रवार पेठ, जि.सातारा-४१५ ००२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त ( प्रशासन ) तथा
प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय,
विधान भवन, पुणे-४११ ०००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
सातारा नगर परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४ / १८७ /सातारा/२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. विनायक श्रीकांत कोटणीस
६१/६२, शुक्रवार पेठ, जि.सातारा-४१५ ००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त ( प्रशासन ) तथा प्रादेशिक संचालक,
नगर परिषद प्रशासन संचालनालय, विधान भवन, पुणे-४११ ०००१
यांचे वतीने नायब तहसीलदार श्री. अे.डी. वेणेगुरकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा यांचे वतीने
नगर रचनाकार श्री. प्र. व. राजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २३.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १७.०१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १०.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांने निर्णय दिल्याची तारीख | १८.८.२.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

'अ' वर्ग नगरपरिषद प्रचलित बांधकाम नियमावलीनुसार सातारा शहरातील बांधकामांसाठी लागू केलेले नियम या संदर्भात माहिती

## विवेचन

गावठाणामधील बांधकाम नियमावलीबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद, सातारा यांनी कळविलेल्या नियमाची साक्षांकित प्रत मिळावी किंवा 'अ' वर्ग नगरपरिषदेच्या प्रचलित बांधकाम नियमावलीची संबंधित नियमाची साक्षांकित प्रत मिळावी, अशी माहिती अपीलकर्ता श्री.विनायक श्रीकांत कोटणीस यांनी मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी ती न दिल्यामुळे श्री.कोटणीस यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त(सामान्य प्रशासन) तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद संचालनालय, विधान भवन, पुणे यांच्याकडे अपील केले. विहित मुदतीत त्याची सुनावणी न घेतल्यामुळे श्री.कोटणीस यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.विनायक श्रीकांत कोटणीस हे सातारा येथील शुक्रवार पेठेत राहत असून शेजारी झालेल्या ओनरशिप अपार्टमेंटच्या बांधकामामुळे त्रास व नुकसान होत आहे, अशी त्यांची तक्रार आहे. त्याबाबत गेल्या ५ वर्षांपासून विविध अर्जांद्वारे, नगरपरिषद, नगररचना संचालनालय इत्यादी विविध पातळ्यांवर व विविध ठिकाणी ते दाद मागत आहेत. माहितीच्या अधिकारात त्यांनी केलेले अर्ज व अपिले हा त्याचाच एक भाग आहे.

गावठाणामध्ये (दाट वस्ती क्षेत्रात ) प्रचलित बांधकाम नियमावलीनुसार हद्दीबरोबर बांधकाम करता येते, हवा, उजेड यासाठी लगतच्या मिळकतीपासून ०.९० मीटर अंतर सोडणे

आवश्यक असते, असे उत्तर मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी श्री.नीळकंठ दत्तात्रय कोटणीस तर्फे श्री.विनायक श्रीकांत कोटणीस यांना दि.२८.१०.२००३ रोजी दिले. श्री.कोटणीस यांचा आक्षेप असलेले बांधकाम त्यानुसार मंजूर नकाशाप्रमाणे असल्याची खात्री करण्यात आली आहे, असे या पत्रात म्हटले आहे. ०.९० मीटर अंतर सोडण्याबाबतच्या नियमाची साक्षांकित प्रत श्री.कोटणीस यांनी मागितल्यावर मात्र जन माहिती अधिकाऱ्यांनी 'प्रचलित बांधकाम नियमावलीमध्ये आपण मागणी केल्याप्रमाणे नियम / तरतूद स्पष्टपणे आढळून येत नाही. त्यामुळे अशा नियमाची प्रत उपलब्ध करुन देता येणार नाही', असे म्हटले आहे. 'अ' वर्ग नगरपरिषदेसाठीची आदर्श बांधकाम नियमावली पुस्तकाच्या दुकानातून उपलब्ध करुन घ्यावी, असेही जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले आहे. मुख्याधिकारी यांनी दिलेल्या पत्रात जो नियम नमूद केला आहे त्याची स्पष्ट तरतूद असणारी प्रत तरी मिळाली पाहिजे किंवा तो कशाच्या आधारे दिला हे स्पष्ट झाले पाहिजे, असा श्री.कोटणीस यांचा आग्रह आहे.

श्री.कोटणीस यांनी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तत्कालीन विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद संचालनालय, विधान भवन, पुणे यांच्याकडे केलेल्या अपिलाची दखल घेतली नसल्याचे आयोगापुढील अपिलात नमूद केले आहे. मात्र विभागीय आयुक्त व अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे असलेला कार्यभार लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी म्हणून केलेल्या त्यांच्या नेमणुकीबाबत फेरविचार व्हावा याबाबत शासनाशी पत्रव्यवहार चालू होता. त्यामुळे विहित मुदतीत सुनावणी घेतली गेली नाही. नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांनी उपायुक्त (सामान्य प्रशासन) पुणे विभाग, पुणे यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करण्याचा निर्णय दि.१६.५.२००६ च्या पत्रान्वये कळविला. त्यानंतर श्री.कोटणीस यांच्या अपिलाची सुनावणी दि.२२.६.२००६ व दि.७.७.२००६ रोजी घेऊन दि.१८.८.२००६ रोजी निर्णय देण्यात आला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन) तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद संचालनालय, विधान भवन, पुणे श्री.एस.जी.कोचे यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयात 'अपिलार्थी यांनी प्रचलित बांधकाम नियमावलीबाबत किंवा सिटी सर्व्हे क्र.१३६ मधील बांधकामाबाबत मुख्याधिकारी, सातारा यांनी दिलेल्या

निर्णयाविरुध्द सक्षम अधिकाऱ्यांकडे अपील अर्ज करुन योग्य तो निर्णय,' घ्यावा असे म्हटले आहे. हे सक्षम अधिकारी कोण, अशी विचारणा श्री.कोटणीस वारंवार करीत आले असून जन माहिती अधिकारी अथवा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांच्याकडून त्यांना समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. सक्षम अधिकारी यांचे पदनाम व पत्ता श्री.कोटणीस यांना दोन दिवसात द्यावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु 'सक्षम अधिकारी असा उल्लेख नियमावलीमध्ये कोठेही दिसून येत नसल्यामुळे तशी माहिती देता येत नाही, मात्र बांधकाम नियमावलीस अंतिम मान्यता शासनाच्या नगरविकास विभागाकडून देण्यात येत असल्याने सदर प्रकरणी शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त करुन घेणे आवश्यक वाटते,' असे मुख्याधिकारी, सातारा श्री.सतीश कुलकर्णी यांनी दि.१४.९.२००७ (प्राप्त दि.१७.९.२००७) रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

माहिती देण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित असलेली सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता व उत्तरदायित्व याविषयीची अनास्था त्यात दिसून येते. तसेच सक्षम प्राधिकारी असा शब्द नियमावलीत असतो की त्या त्या विषयानुसार सक्षम प्राधिकारी कोण हे ठरते, याचाही विचार मुख्याधिकारी यांनी केलेला नाही. याबाबत आयोग तीव्र नापसंती नोंदवीत आहे, व गांभीर्याने दखल घेऊन उत्तर देण्याची समज त्याना देण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) ०.९० मीटर अंतर सोडावे या नियमाबाबतची नेमकी तरतूद असलेल्या माहितीची प्रत अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. अशी स्पष्ट तरतूद उपलब्ध नसल्यास अंतराबाबतचा हा निकष कोणत्या नियमावलीच्या आधारे ठरविण्यात आला हे

स्पष्ट करणारी माहिती अपीलकर्त्यास दि.२५.२.२००८ पर्यंत द्यावी. जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा यांची राहील.

(३) अपीलकर्त्याने मागितलेल्या प्रचलित बांधकाम नियमावलीविषयीच्या पुढील कार्यवाहीसाठी सक्षम अधिकारी म्हणजे कोणत्या पदावरील अधिकारी व त्याचा पत्ता ही माहिती मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी दि.२९.२.२००८ पर्यंत अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. सक्षम अधिकारी त्यांना माहीत नसल्यास अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन) तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद, संचालनालय, पुणे विभाग, पुणे यांनी त्याबाबत त्यांना मार्गदर्शन करावे. वरील दोन्हींचा पूर्तता अहवाल मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांनी अपीलकर्त्याला दिलेल्या उत्तराच्या प्रतीसह आयोगाला दि.५.३.२००८ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

पुणे.
दि. ११/२ /२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळकृष्ण धोंडिबा गुजर
मु. पो. बनघर, ता. जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी
जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, सातारा
तथा भूसंपादन अधिकारी, सातारा, ता. जि. सातारा — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५ / सातारा/२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बाळकृष्ण धोंडिबा गुजर, मु. पो. बनघर, ता. जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी, सातारा, जि. सातारा
श्री. वसंत एन. देशमाने

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, सातारा
तथा भूसंपादन अधिकारी, सातारा, ता. जि. सातारा श्री. संजय शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे बनघर येथील २०५ प्रकल्पग्रस्तांना मौजे म्हासुर्णे व चितळी, ता. खटाव येथे शासनाने पर्यायी जमीन, भूखंड वाटप करण्याचे नियोजित करुन प्रकल्पग्रस्तांना सन २००५-०६ या कालावधीमध्ये पर्यायी जमीन व भूखंड वाटप केल्याच्या कब्जेपट्ट्या आदेश यांच्या नकला, व ज्या प्रकल्पग्रस्तांना अद्याप वाटप का केले नाही त्याची कारणे लेखी खुलाशासह

## विवेचन

बनघर, ता.जि.सातारा येथील प्रकल्पग्रस्तांना दिलेली पर्यायी जमीन व भूखंड वाटप, कब्जेपट्टीचे आदेश इत्यादी संदर्भात अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण धोंडिबा गुजर यांनी माहिती मागितली होती. ती न मिळाल्याचे कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील केले. त्याची दखल घेतली गेली नाही म्हणून श्री.गुजर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपील आपल्याला मिळाले नव्हते, म्हणून दखल घेता आली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, सातारा श्री.वसंत देशमाने यांनी त्यांच्या दि.५.९.२००७ (प्राप्त दि.१०.९.२००७)च्या पत्रान्वये कळविले आहे. पत्रात त्यांनी खुलासा केला आहे की, अपील संकलनाकडील नोंदवही व संबंधित कागदपत्र यांची पडताळणी केली असता, अर्ज इकडे प्राप्त झाला नसलेचे दिसून आले. यास्तव आवक बारनिशी विभागाकडे याबाबत लेखी विचारणा केली असता, त्यांचेकडील अनौपचारिक संदर्भ क्र.साशा/प्रशासन/कावि-११६५, दि.३.९.२००७ नुसार त्यांनी कळविले की, सामान्य प्रशासन शाखा (स्वागत कक्ष) येथील जुन्या कागदपत्रांचा शोध घेतला असता सदरचा अपील अर्ज दि.३.५.२००६ रोजी त्यांचे शाखेस प्राप्त झालेला आहे. सदर अपील अर्ज वेळीच अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्राप्त न झालेने त्याबाबत सुनावणी घेऊन निर्णय घेता आला नाही. जाणूनबुजून अर्जदार यांच्या अर्जाबाबत निर्णय घेतला नाही असे मुळीच नाही.

ऊरमोडी प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भातील हा प्रश्न असून बनघर येथील प्रकल्पग्रस्तांना मौजे चितळी व म्हासुर्णे, ता.खटाव येथील लाभक्षेत्रातील पर्यायी जमीन व भूखंडवाटप याबाबतचा हा विषय आहे. सन १९९७-९८ पासूनचे हे प्रकल्पग्रस्त असून सन २००५-२००६ साली त्यांना पर्यायी जमीन व भूखंडवाटप करण्याबाबतचा लेखी आदेश उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग यांनी दिला आहे व त्याप्रमाणे कब्जेपट्ट्या झाल्या आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित खातेदारांच्या नावांची यादी श्री.गुजर यांच्याकडे मागितली. श्री.गुजर यांनी ती पुरविली. एकूण २७५ प्रकल्पग्रस्तांपैकी ११९ प्रकल्पग्रस्तांना जमीन व भूखंडवाटप केलेले नाही व अपीलकर्ता श्री.गुजर यांचा त्यात समावेश आहे. फक्त ७२ प्रकल्पग्रस्तांनाच जमीन व भूखंड वाटपाबाबत सन २००५ ते एप्रिल २००६ अखेर आदेश केलेले आहेत. प्रकल्पग्रस्तांची सुमारे ५५ ते ६० हजार रुपये एवढी ठेव शासनाकडे जमा आहे. कब्जेपट्ट्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी तेव्हाच दिल्या असत्या तर शासनाला सुमारे १६ लाख रुपये एवढी रक्कम व्याजापोटी द्यावी लागली नसती. उपविभागीय अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा, स्वार्थी नेत्यांचा दबाव, राजकीय द्वेष यामुळे कब्जेपट्ट्या, आदेश व निकाल यांची माहिती दिलेली नाही, असा आरोप श्री.गुजर यांनी केला. परंतु २००५-२००६ ला आदेश केलेला नाही, कब्जेपट्टी दिलेली नाही. त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न नव्हता म्हणून यादी मागणारे पत्र दिले, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा श्री.संजय शिंदे यांनी सांगितले. तसेच आरोपांचा त्यांनी इन्कार केला. दोन गावांमधील वादामुळे जमिनीचे वाटप पूर्ण करता आले नाही, असे श्री.संजय शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, सातारा श्री.वसंत देशमाने यांनी सांगितले. या वादाचे स्वरुप त्यांनी विस्ताराने विशद केले.

कब्जेपट्ट्या व आदेश याबाबत तपासणी करण्यात येईल, असे श्री.देशमाने यांनी नमूद केले.

ऊरमोडी प्रकल्पग्रस्तांच्या अडीअडचणीबाबत दि.२५.९.२००७ रोजी बैठक झाली त्यात ठरल्याप्रमाणे पूर्वीच्या कब्जेपट्ट्या रद्द करुन प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या पसंतीशिवाय उपलब्ध जमिनीचे, ज्यांची जमीन जास्त संपादन झाली आहे त्यांना अग्रक्रम या न्यायाने फेरवाटप करण्यात

येणार आहे, असे उपविभागीय अधिकारी, सातारा श्री.संजय शिंदे यांनी आयोगाला दि.१०.१०.२००७ तारीख असलेल्या व दि.२५.१०.२००७ ला पाठविलेल्या (प्राप्त दि.२९.१०.२००७) पत्रान्वये कळविले आहे.

विषय गुंतागुंतीचा व प्रामुख्याने प्रशासकीय कारवाईच्या स्वरुपाचा असल्याचे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन दिसते. अशी कार्यवाही हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र अपीलकर्त्याला अपेक्षित असलेली रास्त माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) बनघर येथील प्रकल्पग्रस्तांच्या कब्जेपट्ट्या व आदेश याबाबतची दि.१३.१.२००६ अखेरची पूर्ण माहिती, कब्जेपट्ट्यांच्या संदर्भातील अद्ययावत माहिती प्रमाणित नकलांसह अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा यांनी दि.२०.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) अपर जिल्हाधिकारी, सातारा यांनी अपिलाच्या संदर्भातील कार्यालयीन गलथानपणाबद्दल संबंधितांना लेखी समज देऊन त्याची प्रत आयोगाला सादर करावी.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र — पुणे)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. ८/२/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कमलाकर शिवाजी भोईटे,
मु. पो. तडवळे, सं.वाघोली, ता.कोरेगाव,
जि. सातारा                                                   अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा          उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६ / सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कमलाकर शिवाजी भोईटे, मु. पो. तडवळे, सं.वाघोली, ता.कोरेगाव, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा
श्री. प्रकाश भ. तिजारे

**जन माहिती अधिकारी तथा** अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा श्री. सदाशिव हरी राऊत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

भैरवनाथ शिक्षण संस्थेची नमूद कागदपत्रे
१. मासिक/वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त
२. सन २००० ते २००६ पर्यंतचे आजी व सर्वसाधारण सभासद व संचालक मंडळाची यादी
३. कर्मचारी नेमणूक व मेहनताना त्यांच्या छायांकित प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कमलाकर शिवाजी भोईटे यांनी भैरवनाथ शिक्षण संस्था संचलित वत्सलाबाई भोईटे माध्यमिक विद्यालय, तळवडे सं.वाघोली, ता.कोरेगाव, जिल्हा सातारा या संस्थेबाबतची सन २००२ ते फेब्रुवारी २००६ अखेरची माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा यांच्याकडे मागितली होती. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे ट्रस्टच्या हिशेबपत्रकाची माहिती असणे अपेक्षित होते. परंतु भैरवनाथ शिक्षण संस्थेच्या विश्वस्तांनी ती सादर केली नसल्यामुळे ती त्वरित देता आली नाही. इतर मुद्दे संस्थेच्या अखत्यारीतील माहितीसंबंधीचे होते. पत्रे लिहून कळवूनही संस्थेकडून ती माहिती न मिळाल्यामुळे देता आली नाही, असे जन माहिती अधिका-यांनी नमूद केले. त्याविरुध्द श्री.भोईटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अपील केले. परंतु तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.एस.बी.देवधर यांनी आपल्या अपिलाची योग्य ती दखल घेतली नाही, तीन

महिने तारखा दिल्या व संबंधित संस्था चालकांशी संगनमत करुन अपील फेटाळले, असा आरोप करुन श्री.भोईटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री भैरवनाथ शिक्षण संस्था सन २००१ च्या सुमारास स्थापन झाली असून संस्थेबाबत गैरकारभाराची चर्चा पंचक्रोशीत चालू असल्यामुळे आपल्याला त्वरित माहिती मिळणे आवश्यक होते, असे प्रतिपादन श्री.भोईटे यांनी केले. मात्र भैरवनाथ शिक्षण संस्था या ट्रस्टच्या विश्वस्तांनी हिशेबपत्रके सादर केलेली नव्हती, हे या अर्जानंतर लक्षात आले. इतर मुद्दे संबंधित संस्थेकडेच असलेल्या माहितीविषयीचे होते. जन माहिती अधिकाऱ्यांनी दुसऱ्याच दिवशी श्री. भोईटे यांच्या अर्जाची प्रत संस्थेला पाठवून सात दिवसात आपल्याकडे माहिती सादर करण्यास कळविले. संस्थेने मुदत मागूनही माहिती सादर केली नाही. म्हणून पुढील कार्यवाहीची सूचना देणारे पत्र पाठविले, त्यावर संस्थेने पुन्हा मुदत मागितली. संस्थेने हिशेबपत्रके सादर करताच आपण श्री.भोईटे यांना त्याची प्रत दिली व अन्य माहिती मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा श्री.सदाशिव हरी राऊत यांनी सांगितले. श्री.देवधर यांच्या संदर्भात श्री.भोईटे यांनी केलेले आरोप निराधार आहेत, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा श्री.प्रकाश तिजारे यांनी सांगितले.

माहिती देण्याविषयी, तसेच न दिल्यास कारवाई करण्याबाबतचा इशारा देणारी पत्रे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयामार्फत पाठविण्यात आल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मात्र संबंधित संस्थेकडून उर्वरित मुद्दयांची माहिती त्यांना मिळवून देता आली नाही. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ, विश्वस्त संस्थांची संख्या, त्यांच्याबाबतचे वादविवादाचे व अन्य विषय यांमुळे एकाच प्रकरणात बारकाईने लक्ष घालणे शक्य होत नाही, असे श्री.तिजारे यांनी विस्ताराने स्पष्ट केले. आयोग त्याची नोंद घेत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अमान्य.

(२) मूळ अर्जात अपेक्षित असलेली व न मिळालेली नेमकी माहिती कोणती हे निश्चित करणारे स्वतंत्र पत्र अपीलकर्त्याने भैरवनाथ शिक्षण संस्थेला व जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांना सादर करावे व स्वतंत्र अर्ज न मागता संदर्भित अपिलाचा भाग म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांना संबंधित संस्थेकडून अपीलकर्त्यास ती प्राप्त करुन द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता, त्याचा पूर्तता अहवाल दि.२०.२.२००८ पर्यंत अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा यांनी आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि. ८/२ /२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नरेंद्र राघवेंद्र सुमंत
रा. १०९७ अ, शनिवार पेठ, सातारा
जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार,
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नरेंद्र राघवेंद्र सुमंत, रा. १०९७ अ, शनिवार पेठ, सातारा जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. रमेश चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार, सातारा नगरपरिषद, सातारा
**भाग-निरीक्षक** : सातारा नगरपरिषद, सातारा श्री. अशोक जाधव
( मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद यांचेवतीने )

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.५.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

श्री.अमृत सुमंत स.क्र.१०९७अ, शनिवार पेठ, सातारा यांनी बांधलेल्या बेकायदेशीर घरासंबंधी सातारा नगरपालिका यांचेकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसलेबाबत.
लोकशाही दिनी टोकन क्र.१२४/२००६ प्रमाणे ६.२.२००६ रोजी अर्ज केला. त्याचे उत्तर ३० दिवसाचे आंत देणे आवश्यक होते, ते जवळजवळ आठवडा उलटून गेला तरी न दिलेबाबत
१.वरील अर्जाचे उत्तर आजतागायत का दिले गेले नाही.
२.वरील अर्ज सातारा नगरपरिषद यांचेकडे कारवाईसाठी पाठविला आहे का, असल्यास केंव्हा.
३.अर्जात तत्कालीन शहररचनाकार(सातारा नगरपरिषद)श्री.लोंढे यांच्याकडून याबाबत जाणून-बुजून दिरंगाई केली गेल्याची तक्रार केलेली आहे. तसेच बेकायदेशीर बांधकाम मंजूर करण्यासाठी प्रयत्न करत होते, त्यांची तक्रार केलेली आहे. प्रशासन याबाबत चौकशी करणार का, केव्हा.
४.अर्जासोबत मंजूर झालेला नकाशा दि.९.७.२००३ व सुधारीत नकाशा दि.२५.९.२००४यातील फरक दिसत आहे. प्रत्यक्षात बांधकाम याहूनही वेगळे आहे. त्याबाबत काय कारवाई केली जाणार.
५.दि.२.३.२००६ रोजी सातारा न्यायालय यांनी दिलेल्या निकालासंदर्भात आपणांस प्रथम पत्र दिले आहे व कोर्टाने मंजूर झालेल्या नकाशाप्रमाणे बांधकाम झाल्याचे गृहीत धरले आहे व तसे प्रतिपादन कोर्टात श्री.अमृत सुमंत यांचेतर्फे केले गेले होते. प्रत्यक्षात मात्र बांधकाम तसे केले गेलेले नाही, हेही स्पष्ट झालेले आहे. तेव्हा आता याबाबत आपले कार्यालयाकडून सातारा नगरपरिषद यांना कार्य सूचना दिल्या जाणार.

## विवेचन

सातारा नगरपरिषदेच्या हद्दीत आपल्या घरालगत बेकायदेशीर बांधकाम झाल्याच्या संदर्भात, तसेच या अनुषंगाने लोकशाहीदिनी जिल्हाधिकारी, सातारा यांना सादर केलेल्या पत्रावरील कार्यवाही याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत यांनी मागितली होती. माहिती नगरपरिषदेच्या अखत्यारीतील असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने लोकशाहीदिनातील अर्ज नगरपरिषदेकडे पाठविल्याचे श्री.सुमंत यांना कळविले. तसेच नगरपरिषदेने संबंधित माहिती श्री.सुमंत यांना दिली. परंतु दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन श्री.सुमंत यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडील अर्जावर जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांनी सुनावणी घेतली. सातारा नगरपरिषदेकडील विषय ज्यांच्यावर बेकायदेशीर बांधकामाबाबत मदत केल्याचा आपण आरोप केला आहे ते

विभागीय निरीक्षक श्री.अशोक जाधव यांनी हाताळला, अशी तक्रार श्री.सुमंत यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

सुमंत भाऊबंदांच्या कौटुंबिक वादातून न्यायालयीन व इतर संघर्ष चालू आहे. श्री.अमृत सुमंत यांचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे केलेले नाही व त्यांनी केलेल्या बेकायदेशीर बांधकामाला परवानगी नसताना त्यांनी त्याचा वापरही सुरु केला आहे, अशी श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत यांची तक्रार आहे. संबंधित जागेतील सुमंत भाऊबंदांच्या भावांपैकी कोणाचेही बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे नाही. त्यामुळे 'संबंधित मिळकतीचे मोजणीद्वारे नकाशे सादर केल्यानंतरच अतिक्रमणाबाबतचा निर्णय होऊ शकेल व त्यानंतर नियमावलीतील तरतुदीनुसार कार्यवाही करणे योग्य होईल,' असे मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांनी श्री.सुमंत यांना अन्य एका अर्जाच्या अनुषंगाने कळविले आहे. अन्य एका अर्जावर जन माहिती अधिकारी, सातारा नगरपरिषद यांनी सर्व मुद्दयांचे उत्तर 'प्रश्नोत्तर स्वरुपात माहिती देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियमातील २००५ मध्ये नाही म्हणून माहिती देता येत नाही', असे दिले आहे.

श्री.अमृत सुमंत यांना आपल्या नावाचे पत्र मिळेल अशी व्यवस्था श्री.अशोक जाधव यांनी जाणीवपूर्वक केली, असा आरोप श्री.नरेंद्र सुमंत यांनी लेखी व तोंडी केला. परंतु श्री.नरेंद्र सुमंत यांना उद्देशून लिहिलेले पत्र शिपायाकडून नजरचुकीने श्री.अमृत सुमंत अशी नोंद होऊन श्री.अमृत सुमंत यांना दिले गेले, असे श्री.नरेंद्र सुमंत यांना याबाबत वांरवार कळविण्यात आले, तसेच पत्राची छायांकित प्रत व टपालबुकाच्या नोंदीची प्रतही त्यांना देण्यात आली. नंतर हे पत्र रद्दही करण्यात आले, असे मुख्याधिकारी, नगरपरिषद, सातारा यांनी नमूद केले.

लोकशाहीदिनात आपण जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्राचे उत्तर नगरपरिषदेने दिले, याला श्री.सुमंत यांनी आक्षेप घेतला आहे. परंतु लोकशाहीदिनात दिलेले अर्ज त्या त्या विभागाकडे पाठविले जातात. त्या त्या विभागामार्फत केलेली कार्यवाही कळविली जाते, असे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री.रमेश चव्हाण यांनी स्पष्ट केले. श्री.अमृत सुमंत यांनी अन्य सुमंत भाऊबंदांच्या संमतीप्रमाणे घर न बांधता बेकायदेशीर बांधकाम करुन हवे तसे बदल

केले. आमच्या तक्रारीमुळे जवळजवळ १० महिन्यांनी सुधारित नकाशा मंजुरीसाठी दिला, प्रत्यक्षात त्याप्रमाणेही बांधकाम केले नाही. तसेच नगरपरिषदेने सुधारित नकाशा अर्ज निकाली काढला. त्यानंतरही विभागीय निरीक्षक श्री. अशोक जाधव यांनी त्यांना बेकायदेशीरपणे सहाय्य केले. त्यामुळे बांधकाम अनुज्ञेय मर्यादेमध्ये असल्याचे प्रमाणित करणारे पत्र रद्द करावे. तत्कालीन नगररचनाकार श्री.लोंढे व श्री.अशोक जाधव यांची खातेनिहाय चौकशी व्हावी व याबाबत झालेल्या कार्यवाहीची चौकशी व्हावी, अशा मागण्या श्री.नरेंद्र सुमंत यांनी केल्या आहेत. हे विषय प्रशासकीय कार्यवाहीचे असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाहीत.

श्री.सुमंत हे ज्येष्ठ नागरिक (वय ७० वर्षे) असून हा विषय माहितीच्या अधिकारात, तसेच अन्य मार्गाने ते सातत्याने मांडत आहेत. माहितीच्या अधिकारात त्यांनी या विषयाबाबत ३१ अर्ज नगरपरिषदेकडे व १२ अर्ज लोकशाहीदिनामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेल्या तीन वर्षात केले आहेत, असे मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा श्री.सतीश कुलकर्णी यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे.

श्री.सुमंत यांनी एकच विषय सातत्याने मांडला आहे ही वस्तुस्थिती आहे. सातारा नगरपरिषदेकडून त्यांना माहिती देण्यात तांत्रिकदृष्ट्या चूक झालेली नाही. मात्र तांत्रिकता सांभाळणाऱ्या या उत्तरांमध्ये माहितीबाबतची पूर्ण पारदर्शकता प्रतिबिंबित होत नाही. अर्जदारासाठी असलेले पत्र शिपायाच्या नजरचुकीने विरुध्द बाजूला दिले जाणे यासारख्या बाबी साशंकता निर्माण करणाऱ्या आहेत. मात्र या संदर्भातील कार्यवाही हा आयोगाच्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**पुणे.**
**दि.७/२/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ. सुवर्णा लक्ष्मण सावंत
ईशकृपा, लक्ष्मीनगर, शिरवळ,
ता. खंडाळा, जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ),
जिल्हा परिषद, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,प्रगती गर्ल्स हायस्कूल,
शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११० + १११ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. सुवर्णा लक्ष्मण सावंत, ईशकृपा, लक्ष्मीनगर, शिरवळ,
ता. खंडाळा, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ),
जिल्हा परिषद, सातारा श्री. उदयसिंह आ. भोसले
अध्यक्ष, श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ, शिरवळ श्री. प्रताप चं. देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल, शिरवळ,
ता. खंडाळा, जि. सातारा श्रीमती के.के. पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.३.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहे जून १९९९ ते २००५ अखेर नेमणूक पत्रके, सेवापुस्तके, सेवक निश्चिती प्रस्ताव, शालेय तपासणी अहवाल, शिकवीत असलेला अभ्यासक्रम, एस.एस.सी.बोर्डाचा ऐच्छिक विषयांचा अहवाल, शासकीय कोर्ससाठी गेलेली माहिती, एस.एस.सी. बोर्ड सुपरविजन, मस्टर शिक्षक हजेरी पत्रके, गोपनीय अहवाल, परीक्षा माहिती, वर्गशिक्षक अहवाल, परीक्षा विभाग प्रमुख माहिती, सेवाज्येष्ठता यादी, पासबुक, चेकबुक-डी.सी.सी.बँक इत्यादी. | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती सुवर्णा लक्ष्मण सावंत यांनी प्रगती गर्ल्स हायस्कूल, शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा या संस्थेतील जून १९९९ ते २००५ अखेरची १८ मुद्यांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल शिरवळ यांनी त्यांना शुल्क कळवून विहित मुदतीत उत्तर दिले. हीच माहिती श्रीमती सावंत यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडेही अन्य अर्जाद्वारे मागितली होती. ती संबंधित प्रशालेकडून घेण्याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. श्रीमती सावंत यांनी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी, 'शुल्क भरणा केल्यानंतर अपीलकर्त्यास अनुक्रमे ८ व ५ दिवसांच्या आत' माहिती देण्याचा आदेश जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल, शिरवळ यांना दिला. त्यानुसार कळविलेले शुल्क श्रीमती सावंत यांनी भरल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल, शिरवळ यांनी त्यांना माहिती दिली. परंतु आपल्याला चुकीची व अपूर्ण माहिती दिली गेल्याचे नमूद करुन श्रीमती सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

शाळांमधील नेमणूक पत्रे, सेवापुस्तके, शिकवीत असलेला अभ्यासक्रम, गोपनीय अहवाल, वर्गशिक्षक अहवाल अशा काही मुद्यांची माहिती श्रीमती सावंत यांनी मागितली असली तरी कोणाच्या संदर्भातील ही कागदपत्रे हवी आहेत याचा उल्लेख अर्जात नाही. प्रामुख्याने श्रीमती सावंत यांना स्वतःच्या संदर्भात ही माहिती हवी असल्याचे लक्षात घेऊन जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे. श्रीमती सावंत या नियमित सेवेत नसल्यामुळे सेवापुस्तकासारख्या काही नोंदी ठेवलेल्या नाहीत, असे मुद्दे वगळता सर्व माहिती दिली आहे. तसेच खर्चासाठी आपण ५०,०००/- रुपये दोन धनादेशांद्वारे त्रयस्थ व्यक्तीच्या नावे देणे, तसेच आपली सून व नात तन्वी सावंत हिला हाकलून देणे, तिच्या गृहपाठ वह्या जप्त करणे व परत न देणे, तिच्या वह्यांवरील सह्यांची खाडाखोड करणे, तिला दमदाटी करणे याची कारणे श्रीमती सावंत यांनी 'माहिती ' म्हणून मागितली आहेत. यातील कोणताच तपशील खरा नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका श्रीमती के.के.पाटील यांनी नमूद केले.

प्रगती गर्ल्स हायस्कूलमध्ये आपण काही काळ काम केले असूनही सेवापुस्तक आदी माहिती दिली जात नाही, जी माहिती दिली आहे ती मूळाबरहुकूम नसून बनावट तयार करुन दिलेली आहे, असे प्रतिपादन श्रीमती सावंत यांनी केले. मुख्याध्यापिका श्रीमती के.के.पाटील तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रताप चं.देशमुख यांनी या आरोपाचा इन्कार केला.

उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता संस्था व श्रीमती सावंत यांच्यामधील वादातून अनेक अर्ज, अन्य पत्रव्यवहार व आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचे दिसून येते. श्रीमती सावंत यांच्या सेवेच्या अनुषंगाने शाळा न्यायाधिकरणाकडे अपील दाखल असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा श्री.उदयसिंह आ.भोसले यांनी सांगितले. उभय बाजूंनी एकत्र बसून माहितीच्या खरेखोटेपणाबद्दल निर्णय करणे शक्य आहे का, याची पडताळणी आयोगाने केली असता प्रत्येक मुद्यावर उभय बाजूंमध्ये परस्परविरोधी भूमिका असल्याचे स्पष्ट झाले. नेमकी माहिती देणारी कागदपत्रे उभय बाजूंनी सादर केलेली नाहीत. या स्थितीत संस्थेच्या संबंधित सर्व कागदपत्रांची शहानिशा करुन माहितीच्या

खरेखोटेपणाबद्दल शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी चौकशी करणे आवश्यक आहे. संस्थेने दिलेली माहिती खोटी असल्याचे त्यात आढळल्यास संस्थेवर कारवाई करावी लागेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) श्रीमती सावंत यांची नेमणूक व अन्य मुद्यांबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती खरी आहे की नाही याबाबत संबंधित सर्व कागदपत्रांची छाननी व अनुषंगिक चौकशी करुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी एक महिन्यात आयोगाला अहवाल सादर करावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल दि.२०.२.२००८ पर्यंत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. ७/२/२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंतराव कृष्णा बोडरे
मु.पो.अहिरे, ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अपर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२ / सातारा/२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंतराव कृष्णा बोडरे
मु.पो.अहिरे, ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.रमेश चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा अपर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.अंकुश भिलावे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.१.२००६ (प्राप्त दि.१०.१.२००६) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>(१)शासन निर्णय क्र.पीकेए-१०५९-x/६६६४१-एल, दि.१९ मे, १९५९, (२)क्र.बीआयडब्ल्यू /३५०३/५३६/सीएन-५४/एल-४, दि.१९.६.२००३, (३)संकीर्ण २००३/ १११० /ल-४, दि.५.७.२००४, मंत्रालय लोकशाही दिन टोकन क्र.१२४५, दि.५.७.२००४, (५)बीआयडब्ल्यू /३५०५/एसएन-६७७/ल-४, दि.६.९.२००५, (६)मंत्रालय लोकशाही दिन टोकन क्र.१३६२, दि.७.११.२००५<br>(२)वतन जमीन वाटपानुसार कब्जा कायदेशीर केल्याबाबतचा पुरावा-(१) स.नं.७४-९१(अहिरे) १४८-१४९-१५२-१५३(घाटदरे) २५६-२५७(धावडवाडी), (२)पै.नं.२९१-४७१(अहिरे), ८३०-८३१-८३३-८३४(घाटदरे)१५०४-१५१७ (धावडवाडी), (३)ग.नं.५६७-५७०(अहिरे) ६२३-२-६१३-३(घाटदरे) ३३३-३२३(धावडवाडी), अ.क्र.१ ते ३ मधील कायदेशीर वाटणीच्या तपशीलांची/मंजुरीची सर्व कागदपत्रे. | |

## विवेचन

वतन जमिनींच्या संदर्भातील शासकीय निर्णय, मंजुरीची कागदपत्रे इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री.वसंतराव कृष्णा बोडरे यांनी मागितली होती. तसेच शासन परिपत्रक व मंत्रालयीन लोकशाही दिन याबाबतची माहितीही त्यांनी मागितली होती. परंतु कोणत्या वाटपाशी संबंधित शासन निर्णय हवेत याचा व मागणीचा नेमका बोध होत नसल्यामुळे नेमका तपशील नोंदविणारा अर्ज सादर करावा, असा निर्णय जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.अंकुश भिलावे यांनी दिला. मौजे अहिरे येथील वतन जमिनींच्या वाटपाच्या संदर्भातील अर्ज तहसीलदार, खंडाळा यांच्याशी निगडीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस यांनी तो तहसीलदारांकडे पाठविला. श्री.बोडरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.रमेश चव्हाण यांच्याकडे अपील केले. श्री.बोडरे यांचे

जबाबानुसार अपील निकाली काढल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिला. त्याविरुध्द श्री.बोडरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. या अपिलातही माहितीबाबत नेमकेपणा नाही, तसेच सुनावणीतही श्री.बोडरे अपेक्षित माहितीबाबतचा नेमका तपशील सांगू शकले नाहीत. प्रशासनातील त्रुटींमुळे मागासवर्गियांचे हक्क डावलून शोषण केले जाते, असा मुद्दा त्यांनी मांडला. मात्र माहितीबाबतची मागणी त्यांनी नेमकेपणाने केल्यास संपूर्ण माहिती दिली जाईल, असे श्री.भिलावे व श्री.चव्हाण यांनी सांगितले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) हवी असलेल्या माहितीबाबतचा नेमका तपशील श्री.बोडरे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना लेखी सादर करावा. असा तपशील त्यांनी सादर केलेल्या दिनांकापासून १५ दिवसात जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल दि.१५.२.२००८ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ७.२ .२००८